# विशेष विवाह कायदा, 1954

# The Special Marriage Act, 1954

By

Dr. Chetana Vishwanathrao Donglikar

प्रत्येक व्यक्तीला तिच्या धर्मरूढीनुसार विवाह कायदे लागू होतात. उदा. हिंदूंना हिंदू विवाह कायदा, मुसलमानांना मुस्लिम विवाह कायदा, पारशी समाजासाठी पारशी विवाह कायदा अशाप्रकारे ‘ज्यांच्या-त्यांच्या धर्मानुसार, रूढीपरंपरेनुसार विधीयुक्त विवाह साजरे केले जातात. परंतु काही दाम्पत्य धार्मिक विधी न करता रजिस्ट्रेशन पद्धतीने म्हणजेच ‘कोर्ट मॅरेज’ विवाह करतात अशा विवाह करण्याच्या पद्धती आहेत. परंतु आणखी एक अशीच पद्धत कायद्याने दिली आहे. ती ‘विशेष विवाह कायदा, १९५४.’ वरील प्रत्येक धर्मातील विवाह पद्धती असताना ही एक कशाला असा प्रश्न येणे स्वाभाविकच आहे, परंतु असा कायदा सरकारला करावा लागला तो यासाठी की, दोन वेगवेगळ्या धर्माच्या व्यक्ती प्रेमसंबंधातून एकत्र येऊन विवाह करण्यास इच्छूक असतात असे दाम्पत्य धार्मिक विधीप्रमाणे किंवा रीतीरिवाजाप्रमाणे विवाह न करता विशेष विवाह कायद्यांतर्गत विवाह प्रबंधकासमोर रजिस्टरवर स्वाक्ष-या करून विवाहबद्ध होणे. या पद्धतीने जे दाम्पत्य विवाह करतात, त्यांना वाटते की, घरच्यांचा विरोध असेल, लग्नावर खर्च नको, इ. कारणं असतील.

या कायद्याचे वैशिष्टय़ असे म्हणता येईल की, दोन भिन्नधर्मिय व्यक्तींना विवाहबद्ध होण्यासाठी धर्म न बदलता रजिस्टर पद्धतीने लग्न करता येते. लग्न होण्यासाठी जसे वधूचे वय १८ व वराचे वय २१ पूर्ण असावे, त्यांचे पूर्वी लग्न झालेले नसावे, असेल तर घटस्फोट असावा किंवा मृत असावा, इ. अटी त्यांना कायद्याने बंधनकारक आहेत. या विवाह कायद्यांतर्गत विवाह करण्यासाठी एक महिना अगोदर विवाह इच्छुकांनी विवाह प्रबंधकाच्या कार्यालयात रीतसर नोटीस द्यावी लागते. प्रबंधक विवाह पुस्तिकेत नोंद करील व त्याच्या कार्यालयात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी चिकटवील, याचाच अर्थ हे दाम्पत्य विवाहबद्ध होत आहे, याची माहिती प्रसिद्ध होते. सदर विवाहास कोणाची हरकत असेल तर तीस दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवू शकतो. कोणाचीच काही हरकत नसेल तर एक महिन्यानंतर विवाह होतो. परंतु हरकत असेल तर नकार मिळतो, मग संबंधित व्यक्ती जिल्हा न्यायालयात दाद मागू शकते. असा विवाह हा विवाह प्रबंधकाच्या साक्षीने त्याच्या कार्यालयात किंवा वाजवी फी भरून अन्य ठिकाणी जाऊन तो विवाह झाला, असे दर्शवितो. म्हणजेच त्याच्या समक्ष स्वाक्ष-या होणे गरजेचे.

या विवाहाला नातेवाईक, समाज कोणी लागत नसून तीन सक्षम साक्षीदार योग्य त्या कागदपत्रांसहित लागतात. त्यांच्याही सह्या महत्त्वाच्या असतात. या अटी शर्ती पूर्ण झाल्या म्हणजे विवाह संपन्न असे समजले जाते. मात्र या कायद्याखालील तरतुदी पाळल्या गेल्या नाहीत तर तुरुंगवास किंवा दंड होऊ शकतो. अशा प्रकारे लग्न झाले आणि उणिवा निघाल्या, त्यांना घटस्फोट घ्यावा असे वाटले तर तसा अर्ज करू शकतात. मात्र लग्नाला एक वर्ष पूर्ण होणे आवश्यक आहे. अशा दाम्पत्यांना घटस्फोट, पोटगी इ. कायद्याप्रमाणेच मिळविण्याचा हक्क अबाधित आहे. विशेष म्हणजे असे भिन्नधर्मिय दाम्पत्य लग्नबद्ध होऊ इच्छित असतील तर मात्र या कायद्याने ते विवाहबद्ध होऊ शकतात.

विशेष विवाह कायदा, 1954, या कायदयाच्या अंतर्गत प्रामुख्याने पुढीलप्रमाणे दोन विभाग पडतात.

1. विशेष विवाह कायदयातील प्रकरण 2 मधील (Chapter II) तरतुदीप्रमाणे विवाह संपन्न करणे -

विशेष विवाह कायदयामध्ये नमूद अटींची पूर्तता करीत असलेल्या विवाहेच्छुक वधू-वर यांचा विवाह संबधित विवाह, अधिकारी स्वतः संपन्न करतात.

सदर विशेष विवाहाकरिता इच्छुक वधू-वर यांना 30 दिवस अगोदर विवाह अधिका-याकडे नोटीस दयावी लागते.

नोटीसच्या दिनांकापासून 30 दिवसांपर्यंत विवाहासंबंधी काही हरकत/आक्षेप प्राप्त झाल्यास विवाह अधिकारी त्या आक्षेपांच्या अनुषंगाने चौकशी करतात.

प्राप्त झालेल्या आक्षेपात कायदयात नमूद तरतुदीप्रमाणे तथ्यांश दिसून आल्यास विवाह संपन्न केला जात नाही.

मात्र, 30 दिवसांत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त आक्षेपामध्ये तथ्यांश दिसून न आल्यास विवाह अधिकारी 90 दिवसापर्यंत विवाह संपन्न करु शकतात.

या विवाहास बोली भाषेत किंवा प्रचलित भाषेत ‘कोर्ट मॅरेज ’ असेही म्हटले जाते.

2. विशेष विवाह कायदयातील प्रकरण 3 (Chapter III) मधील तरतुदीप्रमाणे इतर पध्दतीने अगोदरच झालेल्या विवाहाची नोंदणी करणे.

विवाह अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात विवाह नोंदणी संदर्भात अर्ज प्राप्त झाल्यानंतर, कायदयातील कलम 15 मध्ये नमूद अटींची पूर्तता होत नसल्याबाबत सदर विवाहास आक्षेप प्राप्त झाल्यास विवाह अधिकारी त्या आक्षेपांच्या अनुषंगाने चौकशी करतात.

आक्षेपात कायदयात नमूद तरतुदीप्रमाणे तथ्यांश दिसून आल्यास विवाह नोंदणी केली जात नाही.

मात्र, 30 दिवसांत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त आक्षेपामध्ये कायद्यातील तरतुदींप्रमाणे तथ्यांश दिसून न आल्यास विवाह अधिकारी विवाहाची नोंदणी करतात.